# THE BOMBAY KAULI AND KATUBAN TENURES (ABOLITION) ACT, 1953

## (Bombay XLIV of 1953)

---

## मुंबई कौली व कटुबाण सत्ताप्रकार नाहींसें करण्याबाबत अधिनियम, १९५३

---

### अनुक्रमणिका

प्रस्तावना.

कलमें.

१. लघु संज्ञा व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... १०७७

२. व्याख्या ... ... ... ... ... ... ... १०७७

३. कौल परत घेणे ... ... ... ... ... ... १०७७

४. कौली व कटुबाण जमिनीची जमीन महसूलाबाबत जबाबदारी ... ... ... १०७८

५. पडीत जमिनी वगैरे राज्य सरकार मध्यें निहित असणें. ... ... ... १०७८

६. जंगलासंबंधीं हक्क... ... ... ... ... ... ... ... १०७८

७. कौली किंवा कटुबाण जमिनीच्या संबंधांतील हक्क रद्द केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची रीत. १०७८

८. जमीन संपूर्ण आकारणी देण्यास पात्र ठरविल्याबद्दल कोणतीहि नुकसानभरपाई न मिळणें १०७९

९. नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित करण्याजोग्या रोख्याच्या स्वरूपांत देण्याजोगी असणें. १०७९

१०. अपील ... ... ... ... ... ... ... १०७९

११. मुदत ... ... ... ... ... ... ... ... १०७९

१२. न्यायालय शुल्क ... ... ... ... ... ... ... १०८०

१३. कलेक्टराचा निवाडा व न्यायाधिकरणाचा निवाडा हें अखेरचे असणें ... ... १०८०

१४. चौकशी आणि काम हीं न्यायसंबंधीं कामें असण ... ... ... ... १०८०

१५. नियम ... ... ... ... ... ... ... ... १०८०

# सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४*

## [मुंबई कौली व कटुबाण सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम, १९५३]

[२२ जून १९५३]

मुंबई राज्यांतील कौली व कटुबाण सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी मुंबई राज्याच्या कुलाबा, कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्यांतील विवक्षित जमिनी कौली व कटुबाण सत्ताप्रकारांनीं धारण करण्यांत येत आहेत ;

आणि ज्याअर्थी उक्त सत्ताप्रकार नाहींसे करणें आणि उक्त सत्ताप्रकारांसंबंधींचे हक्क व उक्त सत्ताप्रकारांना आनुषंगिक असलेल्या गोष्टी नष्ट करणें तसेंच यांत यापुढें दिलेल्या इतर परिणामभूत व आनुषंगिक गोष्टींसाठीं तरतूद करणें आवश्यक आहे ; त्याअर्थी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबई कौली व कटुबाण सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम, १९५३ असें म्हणावें. लघु संज्ञा व्याप्ति व सुरुवात.

(२) तो मुंबई राज्यांतील कुलाबा, कोल्हापूर व रत्नागिरी या जिल्ह्यांना लागू आहे.

(३) तो राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें याबाबत जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास ह्या अधिनियमांत,— व्याख्या.

(अ) "जमीन महसूल अधिनियम" म्हणजे मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ ;

(ब) "कलेक्टर" या संज्ञेंत ह्या अधिनियमान्वयें कलेक्टरचीं कामें करण्यासाठीं व त्याचे अधिकार चालविण्यासाठीं राज्य सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश होतो ;

(क) "कौल किंवा कटुबाण पट्टा" या संज्ञेचा अर्थ यथास्थिति कौली किंवा कटुबाण जमीन ज्या पट्ट्यान्वयें किंवा कबुलायती अन्वयें धारण करण्यांत येते तो पट्टा किंवा ती कबुलायत असा समजावा ;

(ड) "कौल धारक" म्हणजे कौल किंवा कटुबाण पट्ट्यान्वयें कौल किंवा कटुबाण जमीन धारण करणारा इसम ;

(ई) "कौली किंवा कटुबाण जमीन" म्हणजे कौली किंवा कटुबाण सत्ताप्रकारें धारण केलेली जमीन;

(फ) "कायम धारेकरी" या संज्ञेचा अर्थ, कौली किंवा कटुबाण जमीन धारण करणाऱ्या ज्या इसमाकडे अशी जमीन खरेदीदार म्हणून वैधरीत्या हस्तांतरित करण्यांत आली असेल किंवा जो अशी जमीन वैधरीत्या धारा जमीन म्हणून किंवा ठराविक खंड किंवा आकारणी देऊन धारण करतो असा इसम असा समजावा ;

(ग) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमान्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें ;

(ह) "न्यायाधिकरण" या संज्ञेचा अर्थ मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ अन्वयें रचना केलेलें मुंबई महसूल न्यायाधिकरण असा समजावा.

३. हा अधिनियम अंमलांत येईल त्या तारखेपासून,— कौल परत घेणें.

(१) सर्व कौल व कटुबाण पट्टे यान्वयें रद्द करण्यांत आले आहेत ;

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(२) ह्या अधिनियमान्वयें स्पष्टपणें जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, उक्त पट्ट्यांच्या सर्व अटी व शर्ती व उक्त पट्ट्यांना अनुषंगिक असलेल्या सर्व गोष्टी नष्ट करण्यांत आल्या आहेत, असें समजलें पाहिजे ; आणि

(३) कोणत्याहि कौली किंवा कटुबाण जमिनीच्या बाबतींत बसवितां येतो असा झाडावरील कर या नावाचा कोणताहि कर नाहीसा करण्यांत आला आहे.

कौली व कटुबाण जमिनीची जमीन महसूला-बाबत जबाबदारी.

४. कौलांत, कुटुबाण पट्ट्यांत, न्यायालयाच्या हुकूमनाम्यांत किंवा आदेशांत किंवा कोणत्याहि इतर लेखांत किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधीमध्यें कांहीहि असले तरी,—

(अ) सर्व कौली आणि कटुबाण जमिनी, अधिनियमाच्या व त्याअन्वयें केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार राज्य सरकारास जमिनमहसूल देण्यास पात्र आहेत व असतील; आणि

(ब) (१) जी कौली किंवा कटुबाण जमीन कौलानें धारण करणाराच्या प्रत्यक्ष कब्जांत किंवा जो त्याच्या मार्फत किंवा त्याच्या वतीनें ती जमीन धारण करतो परंतु जो कायम धारेकरी नाहीं अशा कोणत्याहि इसमाच्या कब्जांत असेल त्या कौली किंवा कटुबाण जमिनीच्या बाबतींत कौल धारण करणारा; किंवा

(२) कायम धारेकरी ;

त्यानें धारण केलेल्या अशा जमिनीच्या बाबतींत येणें असलेला जमीन महसूल राज्य सरकारला देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार असेल आणि अधिनियमान्वयें व त्याअन्वयें केलेल्या नियमान्वयें किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर विधीअन्वयें अशा जमिनीच्या संबंधांतील सर्व हक्क त्यास असतील व तो सर्व जबाबदाऱ्यास पात्र असेल.

पडीत जमिनी वगैरे राज्य सरकारच्या आधीन असणें.

५. (अ). कौलाच्या किंवा कटुबाण पट्ट्याच्या शर्तीअन्वयें ज्या पडीत जमिनी कौल धारण करणाराची मालमत्ता असतील परंतु तारीख ४ मार्च १९५३ पूर्वी उपयोगांत किंवा लागवडीखालीं आणलेल्या नसतील, अशा सर्व पडीत जमिनी;

(ब) कौलानें धारण करणारा खेरीजकरून, मालमत्ता धारण करण्यास वैध रीतीनें पात्र असलेल्या कोणत्याहि इसमाची किंवा इसमांच्या समूहाची मालमत्ता नसलेल्या कौली किंवा कटुबाण जमिनी असलेली व अधिनियमाच्या कलम ३७ मध्यें उल्लेख केलेली इतर सर्व प्रकारची मालमत्ता, तींत किंवा तीवर इसमांचे कोणतेहि हक्क शाबित होतील त्या मर्यादेपर्यंत ते खेरीजकरून आणि त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधीअन्वयें इतर रीतीनें तरतूद केलेली असेल तें खेरीजकरून, तिच्यांतील किंवा तिच्यावरील किंवा तिच्या संबंधांतील सर्व हक्कांसह,

राज्य सरकारची मिळकत आहे व असल्याचे यावरून जाहीर करण्यांत येत आहे आणि यथास्थिति, अधिनियमाच्या कलम ३७ किंवा ३८ मध्यें विहित केलेल्या रीतीनें व अशा कारणांकरितां प्राधिकाऱ्यानी तिची विल्हेवाट लावणें व ती विकणें हे वैध असेल.

जंगला-संबंधीं हक्क.

६. अधिनियम, भारताचा जंगलाबाबत अधिनियम किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला इतर कोणत्याहि विधीअन्वयें राखून ठेवण्यांत आलेले जंगलासंबंधींचे हक्क राज्य सरकारच्या आधीन होतील आणि ह्या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधामुळें, राज्यांत अंमलांत असल्याप्रमाणेंचा भारताचा जंगलाबाबत अधिनियम, १९२७ याचे उपबंध कोणत्याहि कौली किंवा कटुबाण जमिनींतील जंगलास लागू करण्याच्या राज्य सरकारच्या हक्कास बाध येणार नाहीं.

कौली किंवा कटुबाण जमिनीच्या संबंधांतील

७. (१) जर कौल धारण करणारास किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या वतीनें दावा सांगणाऱ्या कोणत्याहि इसमास कोणत्याहि मालमत्तेतील त्याच्या हक्कांपैकीं कोणतेहि हक्क नष्ट करणाऱ्या किंवा त्यांत फेरफार करणाऱ्या ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधामुळें आपलें नुकसान झालें आहे असें वाटणाऱ्या इसमास आणि जर असा कौल धारण करणारा किंवा असा इसम, (उक्त हक्क)

नष्ट करणें किंवा त्यांत फेरफार करणें हें त्याच्या मालमत्तेची मालकी सरकारकडे हस्तांतरित करण्यासारखें आहे असें शाबित करील तर, कौल धारण करणारास किंवा इसमास नुकसानभरपाई मिळण्यासाठी कलेक्टर कडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

हक्क रद्द केल्याबद्दल नुकसान-भरपाई देण्याची रीत.

(२) असा अर्ज, हा अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत विहित केलेल्या नमुन्यांत केला पाहिजे.

(३) कलेक्टरनें, अधिनियमान्वयें तरतूद केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्यानंतर, त्यास वाजवी व पुरेशी वाटेल अशी नुकसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा दिला पाहिजे ;

परंतु, कौलाच्या किंवा कटुबाण पट्ट्याच्या शर्तीअन्वयें कौल धारण करणाराची मालमत्ता असलेल्या कोणत्याहि पडीत जमिनींतील कोणताहि हक्क रद्द केल्याबद्दलची नुकसानभरपाईची रक्कम अशा जमिनीच्या दर १०० एकरांमागे २५ रुपये या दरानें हिशोब करून आलेली रक्कम असेल ;

आणखी असें कीं कौल धारण करणाराचा इतर कोणताहि हक्क किंवा इतर कोणत्याहि इसमाचा हक्क नष्ट करतांना किंवा त्यांत फेरफार करतांना कलेक्टरनें जमीन संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ च्या उपबंधांस अनुसरून वागलें पाहिजे.

८. कलम ७ मधील कोणत्याहि उपबंधामुळें, कोणत्याहि इसमास, अधिनियमाच्या उपबंधाप्रमाणें अशा जमिनीच्या बाबतींत देण्याजोग्या पूर्ण आकारापेक्षां कमी मूल्य असलेला ठरविलेला आकार किंवा रोकड पैशांतील किंवा मालाच्या स्वरूपांतील खंड देऊन त्यानें धारण केलेली कोणतीहि कौली किंवा कटुबाण जमीन, ह्या अधिनियमाच्या उपबंधाअन्वयें असा पूर्ण आकार देण्यास पात्र ठरविण्यांत आली आहे या मुद्यावर, नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

जमीन संपूर्ण आकारणी देण्यास पात्र ठरविल्याबद्दल कोणतीहि नुकसान-भरपाई न मिळणें.

९. ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वयें देण्याजोगी नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित करण्याजोग्या रोख्याच्या स्वरूपांत देण्याजोगी असेल आणि असे रोखें काढल्याच्या तारखेपासून त्यांवर दरसाल दर शेंकडा तीन टक्के या दरानें व्याज मिळेल आणि त्या रोख्याची रक्कम ते काढल्याच्या तारखेपासून वीस वर्षांच्या मुदतींत मुद्दल व व्याज यांच्या वार्षिक समान हप्त्यांनीं परतफेड करण्याजोगी असेल; उक्त रोखे विहित करण्यांत येतील अशा दर्शनी किंमतीचे व अशा नमुन्यांत असतील.

नुकसान-भरपाईची रक्कम हस्तांतरित करण्याजोग्या रोख्याच्या स्वरूपांत देण्याजोगी असणें.

१०. (१) कलेक्टरच्या निवाड्यामुळें आपलें नुकसान झालें आहे असें वाटणाऱ्या इसमास न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

अपील.

(२) या कलमान्वयें केलेल्या अपिलांचा निर्णय देतांना न्यायाधिकरणानें, व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वयें मूळ न्यायालयानें दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करतांना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालयानें जी कार्यरीति अनुसरली असेल तीच कार्यरीति अनुसरली पाहिजे.

११. ह्या अधिनियमान्वयें न्यायाधिकरणाकडे केलेले प्रत्येक अपील कलेक्टरच्या निवाड्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतींत दाखल केलें पाहिजे. भारतीय मुदत अधिनियम, १९०८ कलमें ४, ५, १२ व १४ यांचे उपबंध हें असें अपील दाखल करण्याच्या बाबतींत लागू होतील.

मुदत.

यालय ल्क.

१२. न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० यांत कांहींहि असले तरी, ह्या अधिनियमान्वयें न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यांत येईल अशा किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावला पाहिजे.

लेक्टरचा वाडा व यायाधि- करणाचा नर्णय हे खेरचे असणें.

१३. न्यायाधिकरणाकडे करण्यांत आलेल्या अपिलास अधीन राहून कलेक्टरनें दिलेला निवाडा आणि न्यायाधिकरणानें अपिलावर दिलेला निर्णय हे अखेरचे व निर्णायक असतील आणि त्यांवर कोण-त्याहि न्यायालयांतील कोणत्याहि दाव्यांत किंवा कामांत आक्षेप घेतां कामा नये.

चौकशी आणि कामें ही न्याया- संबंधीं कामें असणें.

१४. कलेक्टर व न्यायाधिकरण यांजपुढें ह्या अधिनियमान्वयें चालू असलेली चौकशीची सब कामें व इतर सर्व कामें ही भारतीय दंड संहिता, कलमें १९३, २१९ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्याय-संबंधीं कामें आहेत असें समजलें पाहिजे.

नियम.

१५. राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे असे नियम कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.